| ८.२ योजनेचे नाव | उदयोन्मुख कृषि औद्योगिक क्षेत्रातील शैक्षणिक संधी- शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना. |
|---|---|
| **योजनेची सुरुवात** | सन २०२२-२३ |
| **लाभार्थी लक्षांक** | वसंतदादा साखर संस्था,पुणे या संस्थेतील Industrial Fermentation And Alcohol Technology (Post Graduate Diploma Course-IFAT.) आणि M.Sc. Wine Brewing and Alcohol Technology (Post Graduate Degree Course-WBAT) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेले लक्षित गटातील पात्र विद्यार्थी |
| **योजनेचा उद्देश** | वसंतदादा साखर संस्था,पुणे या संस्थेतील Industrial Fermentation And Alcohol Technology (Post Graduate Diploma Course-IFAT.) आणि M.Sc. Wine Brewing and Alcohol Technology (Post Graduate Degree Course-WBAT) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या संवर्गातील ज्यांचे कुटुंबाचे मागील ३ वर्षातील वार्षिक उत्पन्न हे र.रु. ८.०० लाखांचे आत आहे, अशा विद्यार्थी उमेदवाराकरिता उदयोन्मुख कृषि औद्योगिक क्षेत्रातील शैक्षणिक संधी उपलब्ध करुन देणेसाठी सारथी व्दारा शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना राबविण्यात येते. या माध्यमातून विद्यार्थी यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे व त्या माध्यमातून रोजगार व स्वयं रोजगार निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे हा या योजनेचा उद्देश आहे. |
| **योजनेचे स्वरूप** | वसंतदादा साखर संस्था,पुणे या संस्थेतील Industrial Fermentation And Alcohol Technology (Post Graduate Diploma Course-IFAT.) आणि M.Sc. Wine Brewing and Alcohol Technology (Post Graduate Course-WBAT) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना सत्रनिहाय शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करणे. |
| **प्रशिक्षण ठिकाण** | वसंतदादा साखर संस्था, मांजरी, पुणे |
| **प्रशिक्षण कालावधी /टप्पे** | • IFAT कोर्स - २२ महिने<br>• WBAT कोर्स - २ वर्षे<br>या अभ्यासक्रमासाठी ज्याना प्रवेश मिळालेला आहे आणि योजनेचा लाभ घेण्यासाठी अटी व शर्थी पूर्ण करीत आहेत. असे विद्यार्थी या योजनेसाठी पात्र ठरतील. |
| **लाभार्थी पात्रता** | वसंतदादा साखर संस्था,पुणे यांच्या मार्फत घेण्यात येत असलेल्या IFAT/WBAT या कोर्सकरिता प्रवेश मिळालेल्या विद्यार्थी यांना शैक्षणिक फी प्रतिपूर्ति करण्यासाठी सारथी मार्फत जुलै किवा ऑगस्ट मध्ये वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध केली जाते. त्यानंतर ज्या विद्यार्थी यांनी VSI पुणे मध्ये IFAT व WBAT या अभ्यासक्रमासाठी प्रवेश |

| | |
|---|---|
| | घेतलेला आहे अशा विद्यार्थी यांनी सारथी प्रायोजित शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ति साठी ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे. सदर अर्ज करताना खालील कागदपत्र जोडावेत.<br>• वसंतदादा साखर संस्थेव्दारा प्रवेशाकरिता जुलै महिन्याच्या दुस-या सप्ताहात निवड चाचणी परिक्षा घेतली जाते. परिक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यास वसंतदादा साखर संस्था, पुणे येथे IFAT / WBAT कोर्सकरिता प्रवेश मिळालेला असावा.<br>• जात प्रवर्ग- मराठा,कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा असावा.<br>• कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न- मागील ३ वर्षातील वार्षिक उत्पन्न हे र.रु. ८.०० लाखांचे आत असावे.<br>• महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. |
| **आवश्यक कागदपत्रे** | ऑनलाइन अर्ज करताना अर्जदाराने खालील कागदपत्रांची PDF करून अपलोड करणे आवश्यक आहे. अपलोड केलेली सर्व कागदपत्र सुस्पष्ट व वाचनीय असावीत.<br>• वसंतदादा सप्ताहात विद्यार्थ्यास वसंतदादा साखर संस्था, पुणे येथे IFAT / WBAT कोर्सकरिता प्रवेश मिळाला असल्यास प्रवेश घेतलेल्या व फी भरलेल्याची पावती जोडावी.<br>• जातीचे प्रमाणपत्र जोडावे.<br>• तहसीलदार यांचा उत्पन्न दाखला किंवा EWS प्रमाणपत्र<br>• डोमेसाइल प्रमाणपत्र जोडावे.<br>• आधार कार्ड, जन्म दाखला अथवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र<br>• बँक अकाउंट तपशील<br>• रहिवासी दाखला (डोमिसाईल) |
| **लाभार्थी निवड प्रक्रिया** | • लाभाकरिता ऑनलाईन अर्ज भरण्या करिता जाहिरात सारथीचे संकेत स्थळावर व राज्यातील वर्तमानपत्रा मध्ये प्रसिद्ध केली जाईल.<br>• सर्व कागदपत्र पडताळणी व छाननी केल्यानंतर कागदपत्रे पूर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांची या योजनेसाठी निवड करण्यात येईल.<br>• कुटुंबातील जास्तीत जास्त एकच सदस्यांची प्रशिक्षणाकरिता निवड केली जाईल. |
| **लाभाचे स्वरूप :** | • सारथी मार्फत IFAT मधील विद्यार्थ्याला ३ सत्रा मध्ये रु ३५०००/- प्रती सत्र याप्रमाणे शैक्षणिक फी प्रतिपूर्ति देय राहील . सदर रक्कम मिळण्यासाठी विद्यार्थ्याने एक सत्र पास झाल्यानंतर सत्र पास झाल्याचे प्रोग्रेस रीपोर्ट हा वसंतदादा साखर संस्थेकडून घेऊन मागणीपत्र, Letter of Award आणि मागील सत्राचे शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ति झाली असल्यास ती मिळाल्याची पावती सादर करणे आवश्यक राहील. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून प्रत्येक सत्र प्रथम संधी मध्ये पास |

| | |
|---|---|
| | झाल्यास १००% शैक्षणिक फी प्रतिपूर्ति, द्वितीय संधी मध्ये पास झाल्यास ५० % शैक्षणिक फी प्रतिपूर्ति आणि तृतीय संधीमध्ये पास झाल्यास ३५ % शैक्षणिक फी प्रतिपूर्ति केली जाईल.<br>• WBAT कोर्स करिता विद्यार्थ्याला चार सत्रा मध्ये रूपये ५७५०० /- प्रती सत्र याप्रमाणे शैक्षणिक फी प्रतिपूर्ति देय राहील. सदर रक्कम मिळण्यासाठी विद्यार्थ्याने एक सत्र पास झाल्यानंतर सत्र पास झाल्याचे प्रोग्रेस रिपोर्ट हा वसंतदादा साखर संस्थेकडून घेऊन मागणीपत्र, Letter of Award आणि मागील सत्राचे शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ति झाली असल्यास ती मिळाल्याची पावती सादर करणे आवश्यक राहील. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून प्रत्येक सत्र प्रथम संधी मध्ये पास झाल्यास १००% शैक्षणिक फी प्रतिपूर्ति, द्वितीय संधी मध्ये पास झाल्यास ५० % शैक्षणिक फी प्रतिपूर्ति आणि तृतीय संधीमध्ये पास झाल्यास ३५ % शैक्षणिक फी प्रतिपूर्ति केली जाईल<br>• अधिक संदर्भाकरिता व माहितीकरिता वसंतदादा साखर संस्था, पुणे यांचेकडील संकेतस्थळावरिल माहिती पुस्तिका पहावी व सारथीचे संकेतस्थळास भेट द्यावी. |
| **प्रशिक्षण संस्थेबाबत** | • वसंतदादा साखर संस्था,पुणे या संस्थेमध्ये Industrial Fermentation And Alcohol Technology (Post Graduate Diploma Course-IFAT.) आणि M.Sc. Wine Brewing and Alcohol Technology (Post Graduate Course-WBAT) हे दोन अभ्यासक्रम राबविले जातात.<br>• या दोन अभ्यासक्रमात प्रवेश मिळालेल्या सारथीच्या लक्षित गटातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ घेता येतो. |
| **अपात्रतेचे निकष** | • कागदपत्रे अपूर्ण असणे व विहित मुदतीत सादर न करणे.<br>• ऑनलाइन अर्ज भरताना खोटी किंवा चुकीची किंवा अपूर्ण माहिती भरणे.<br>• VSI पुणे मध्ये IFAT व WBAT या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला नसल्यास<br>• नियमांचे उल्लंघन केल्यास.<br>• तीन पेक्षा जास्त संधीमध्ये सत्र नापास झाल्यास शैक्षणिक फी प्रतिपूर्ति केली जाणार नाही.<br>• अभ्यासक्रमास प्रवेश न मिळणे. |
| **२०२२-२३ ते २०२४-२५ लाभार्थी संख्या** | १८४ |


VSi
संशोधनेन संवृद्धिः
VASANTDADA SUGAR INSTITUTE, PUNE
ESTD.1975
NIKE


VSi
संशोधनेन संवृद्धिः
VASANTDADA SUGAR INSTITUTE, PUNE
ESTD.1975